<u>महाराष्ट्र शासन</u>

क्रमांक : गौखनि ३२/१०१८/प्र.क्र. ३८४/ख
महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : २४ जुलै, २०१९.

विषय **: <u>गौण खनिज-जळगांव</u>**

सन २०१४-१५ या वर्षाकरिता मौजे फुफनगरी भाग-२ या वाळूगटातून मंजूर वाळूचे उत्खनन न करता आल्याने उत्खनन न केलेल्या वाळूची रक्कम परत करणेबाबत.

श्री. सत्यसाई बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. विनोद शालीग्राम पाटील.

<u>शासन ज्ञापन:</u>

जिल्हाधिकारी जळगाव यांना त्यांचे पत्र क्रमांक गौणख/ई-कावि/२०१८/८/२६/९५८, दि. ०५/०९/२०१८ च्या उपरोक्त विषयावरील पत्रांस अनुलक्षून असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, सन २०१४-१५ मध्ये मौजे फुफनगरी भाग २ हा वाळूगट श्री. सत्यसाई बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. विनोद शालीग्राम पाटील यांना रू. १,५५,३९,६००/- इतक्या सर्वोच्च बोलीने मंजूर करण्यात आला.

सदर वाळूगटाच्या लिलावधारकाने दि.३१/०३/२०१५ रोजीच्या मक्ता आदेशातील अट क्र.१६ अ व ब तसेच अट क्र.५४ अ,ब व क चे उल्लंघन केल्याने जिल्हाधिकारी जळगांव यांनी दि.२३/११/२०१५ च्या आदेशान्वये लिलावधारकाने शासनजमा केलेली अनामत रक्कम रू.३१,०३,९२०/- जप्त केली.

सदरच्या आदेशाविरूध्द श्री. पाटील यांनी मा. अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे अपील दाखल केले. अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी दि.१९/०६/२०१८ रोजीच्या आदेशान्वये लिलावधारक यांचा पुनरीक्षण अर्ज अंशत: मंजूर करून जिल्हाधिकारी जळगाव यांचे दि.१२/०४/२०१६ चे आदेश रद्द केले तसेच जिल्हाधिकारी जळगांव यांना अर्जदार यांनी केलेल्या अटी व शर्तींच्या भंगाबाबत यथास्थिती पुरावे तपासून फेरचौकशीअंती आदेश पारीत करण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकारी जळगांव यांनी दि.२९/०८/२०१८ रोजीचे आदेशान्वये लिलावधारक यांनी आदेशातील अटी व शर्तीचा भंग केलेला असल्याने त्यांच्या अनामत रकमेमधून २० टक्के रक्कम जमा करण्याचे आदेश पारित केले आहेत. त्याअनुषंगाने उर्वरीत रक्कम रू.२४,८३,१३६/- परत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सबब, श्री. सत्यसाई बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. विनोद शालीग्राम पाटील यांना एकूण रक्कम रु. २४,८३,१३६/- (रुपये चोवीस लाख त्र्याऐंशी हजार एकशे छत्तीस फक्त) इतकी रक्कम, त्यांनी लिलावाची संपूर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची, तसेच ही रक्कम यापूर्वी अदा केलेली नाही याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. याबाबीवर होणारा खर्च सन २०१९-२० यावर्षाकरीता लेखाशिर्ष "०८५३ - अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२ - खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग - वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे देण्याकरीता करण्यात आलेल्या उपलब्ध अंदापत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

४. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने (त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४०६/२०१८/व्यय-९, दिनांक ०२/११/२०१८ अनुसार दिलेल्या सहमतीनुसार) निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७२४१६२५०४१७१९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.07.25 12:14:46 +05'30'

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी जळगांव, जळगांव

प्रत:

१) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई- ४०० ०२०.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, जळगांव, जळगांव.
५) वित्त विभाग, (व्यय-९/ अर्थसंकल्प -३/६/१४ कार्यासने) मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ३२.
६) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ३२.
७) निवडनस्ती “ख” कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ३२.